**प्रेस नोट दि. २३.०२.२०२६**

**खाजगी इसम आरोपी श्री. संजय शंकर पवार, वय -५६ वर्षे, व्यवसाय - शेती, रा. बस स्टॉप जवळ, शिरगांव (वि.), ता. तासगांव, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली व सापळा कारवाईमध्ये १०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता पकडले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सांगली |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | तासगांव पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ४१ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | खाजगी इसम आरोपी श्री. संजय शंकर पवार, वय -५६ वर्षे, व्यवसाय - शेती, रा. बस स्टॉप जवळ, शिरगांव (वि.), ता. तासगांव, जि. सांगली |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | दि.२९.०१.२०२६ रोजी १५०००/- (पंधरा हजार ) रुपये लाचेची मागणी केली व दि.२३.०२.२०२६ रोजी चर्चेअंती १०,०००/- रुपये लाचेची मागणी तलाठी कार्यालय शिरगांव (वि) येथे केली. |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | १०,०००/- (दहा हजार ) रुपये |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.२३.०२.२०२६ रोजी तलाठी कार्यालय शिरगांव (वि) येथे |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचे वडीलांनी गहाणस्वरूपी मुदतखरेदीने लिहुन दिलेली जमीन तक्रारदार व त्यांचे बहीणीने रिकन्व्हेन्सपत्राद्वारे दस्त करुन घेतली आहे. सदर रिकन्व्हेन्स पत्राद्वारे केलेल्या दस्ताची नोंद तलाठी कार्यालय शिरगांव (वि), ता. तासगांव येथे होण्यासाठी तक्रारदार यांनी तलाठी कार्यालय शिरगांव (वि), ता. तासगांव येथे जावुन तेथे काम करणारे खाजगी इसम संजय पवार यांची भेट घेवुन रिकन्व्हेन्स पत्राद्वारे केलेल्या दस्ताची नोंद होणे बाबतचा अर्ज दिला होता. खाजगी इसम संजय पवार यांनी तक्रारदारानी दिलेल्या अर्जातील दस्ताची नोंद तलाठी शिरगांव (वि), ता. तासगांव यांना सांगुन सात बारा उतान्यावर धरुन, नोंद मंजुर करुन देण्यासाठी स्वतःकरीता व तलाठी शिरगांव (वि) यांचे करीता १५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेबाबतचा अर्ज तक्रारदार यांनी दि.२९.०१.२०२६ रोजी पथकास दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.२९.०१.२०२६ रोजी तलाठी कार्यालय शिरगांव (वि), ता. तासगांव येथे पडताळणी केली असता तेथे काम करणारे खाजगी इसम संजय पवार यांनी तक्रारदार यांचेकडे अर्जातील दस्ताची नोंद तलाठी शिरगांव (वि), तासगांव यांना सांगुन सात बारा उतान्यावर करुन घेतो असे म्हणुन स्वतःकरीता १५,०००/- रुपये लाचेची मागणी केली व दि.२३.०२.२०२६ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये चर्चेअंती तक्रारदार यांचेकडे १०.०००/- रुपये लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर दि.२३.०२.२०२६ रोजीचे सापळा कारवाई वेळी खाजगी इसम संजय शंकर पवार यांनी तक्रारदार यांचेकडून तलाठी कार्यालय शिरगांव (वि), ता. तासगांव येथे १०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने खाजगी इसम आरोपी श्री. संजय शंकर पवार, वय -५६ वर्षे, व्यवसाय - शेती, रा. बस स्टॉप जवळ, शिरगांव (वि.), ता. तासगांव, जि. सांगली यांचेविरूध्द तासगांव पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, पोलीस निरीक्षक श्री.किशोरकुमार खाडे, योगेश चव्हाण तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, रामहरी वाघमोडे, ऋषिकेश बडणीकर, पोपट पाटील, उमेश जाधव, सलीम मकानदार, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, चंद्रकांत जाधव, सीमा माने, सागर नायकुडे. |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली — सत्यमेव जयते

**श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**सांगली.**

Scanned with OKEN Scanner